# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**2022**

गुन्हे शाखा, नवी मुंबई                                        दिनांक ०७.११.२०२२

### तुर्भे पोलीस ठाणे हद्दीमध्ये गुटखा विक्री करणा—या इसमावर अंमली पदार्थ विरोधी पथकाने केलेली कारवाई.

---

मा.श्री.बिपिन कुमार सिंह, पोलीस आयुक्त, मा.डॉ.जय जाधव, सह पोलीस आयुक्त, मा. श्री.महेश घुर्ये, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), मा. श्री. सुरेश मेंगडे पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा), मा. श्री. विनायक वस्त, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांनी नवी मुंबई नशामुक्त करण्याचे व अंमली पदार्थ विक्री करणा—या इसमांविरुध्द विशेष मोहिम आयोजीत करून कारवाई करण्याचे आदेश वेळोवेळी दिलेले आहेत.

दि.०३/११/२०२२ रोजी तुर्भे पोलीस ठाणे हद्दीत भगवान पाटील यांची चाळ, रुम नंबर ३, हनुमान मंदिर जवळ, महापे गाव, तुर्भे नवी मुंबई येथे एक इसम महापे गाव, हनुमान मंदिराजवळ भगवान पाटील यांच्या चाळीतील पहिल्या मजल्यावरील उत्तरेकडुन जिन्या पासुनच्या ३ नंबरच्या रुम मध्ये इसम नामे संतोष प्रभु साव नावाचा इसम प्रतिबंधीत गुटखा व सुगंधीत तंबाखुचा साठा करुन होलसेल विक्री करतो आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बी.एस सय्यद, पोलीस उप निरीक्षक, शिंगे, पोहवा/१२०२ पिरजादे, पोहवा/१३०१ उटगीकर, पोहवा/५७८ गायकवाड, पो.कॉ./२३७८ अर्जुन पवार तसेच चालक पोहवा/४१८६ राकेश अहिरे यांना मिळालेल्या माहिती नुसार सदर ठिकाणी छापा टाकुन सदर रूममधुन **१,६५,७४८/—रू किंमतीचा प्रतिबंधीत गुटखा व सुगंधीत तंबाखुचा साठा जप्त केला.** सदर इसमास पोलीसांची चाहुल लागल्याने छापा टाकणे अगोदरच गल्ली बोळाचा फायदा घेवुन पळुन गेला आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

सदर इसमाविरूध्द तुर्भे पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर २८४/२०२२ भादवि कलम १८८,२७२,२७३,३२८ सह अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ चे कलम २६,२७,५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस.सय्यद हे करीत आहेत.

————————————